CNRNo.MHSI010000642018

# <u>नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १५/२०१८ मधील नि. २५, २९ व ३० खालील सामाईक आदेश.</u>

(श्री. दत्ताराम भिकाजी साटम – पुनर्वादी वि. सुरेखा सुरेश साटम, वगैरे – उत्तरवादी)

.......

१. अर्जदार यांनी नि. २५ चा अर्ज पुनर्वादी श्री. दत्ताराम भिवाजी साटम याचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, नि. २९ चा अर्ज उपशमीतचा आदेश रद्द करणेकरीता आणि नि. ३० चा अर्ज पुनर्वादी याचे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले व पुनर्वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उत्तरवादीनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिलेले नाही.

३. अर्जदारांचे असे कथन आहे की, पुनर्वादी श्री. दत्ताराम भिवाजी साटम हे दि. १९/११/२०२० रोजी मयत झाले. पुनर्वादी यांचे मुंबई येथे निधन झाले, त्या कालावधीत कोविड–१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे व पुनर्वादीचे वारस मुंबई येथे वास्तव्यास असल्यामुळे त्यांना वारस अभिलेखावर आणणे शक्य झालेले नाही. त्यामुळे अर्जदार याना वारस अभिलेखावर आणण्यास १५ दिवसांचा विलंब झालेला आहे.

४. अभिलेखावरील मृत्यू प्रमाणपत्रावरुन पुनर्वादीचा मृत्यू दिनांक १९/११/२०२० रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तावित वारस हे पुनर्वादीचे नसल्याबाबत उत्तरवादींनी आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. उलटपक्षी, पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन प्रकरण गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – <u>आ दे श</u> –

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेत येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेणेत यावेत.

३. अर्जदारांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

(संजय जु. भारुका),

दिनांकः– १५/०३/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,

सिंधुदुर्ग–ओरोस.